# महिला सबलीकरण : राष्ट्रीय व राज्यशासनाचे धोरण एक अभ्यास.

डॉ. व्ही. एम. पाटील ए. एस. सी. कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) जि. सांगली.

**प्रस्तावना :** आपल्या समाजाचा विकास व्हावा याचा विचार सर्व जगभर होत असतो, पण अलीकडे विकासप्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग या संदर्भात जागतिक पातळीवर विचार होऊ लोगलेला आहे. १९५५ मध्ये 'कोपेन हेगेन' येथे झालेल्या 'लोकसंख्या आणि विकास' यावर आंतरराष्ट्रीय परिषदेत 'स्त्री आणि विकास' याविषयी चर्चा करण्यात आली. संयुक्त राष्ट्राच्या स्त्रीसंबंधी जागतिक परिषद १९९५ मध्ये बिर्जीग येथे झाली तिथे स्त्रियांची राष्ट्रीय विकासात महत्त्वपूर्ण भूमिका असते याची चर्चा करण्यात आली. स्त्रियांची संख्या लोकसंख्येच्या ५० टक्के असून राष्ट्राच्या विकासात लोकसंख्येच्या ५० टक्के घटकांचा समावेश न करता खऱ्या अर्थाने विकास होऊ शकत नाही. याची जाणीव सर्वत्र झालेली आहे. हे जाणून भारत सरकारने लिंगभेदाचे अडथळे दूर करून स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान दर्जा प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. किंबहुना भारतीय घटनेमध्ये याची तरतुद केली आहे.

भारतीय घटनेने मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांच्या माध्यमातून काही हक्क आणि विशेष तरतूदी केल्या आहेत. घटनेतील अनच्छेद १४ अंतर्गत स्त्री आणि पुरूष यांना राजकिय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात समान हक्क आणि संधी देऊ केलेली आहे. या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणार्थ भारतीय शासनाने काही महत्त्वपूर्ण कायदे केलेले आहेत. उदा. समान वेतन कायदा, हिंदू विवाह कायद्यात १९६६ मध्ये केलेली दुरूस्ती हुंडा प्रतिबंधक कायदा, सती प्रतिबंधक कायदा, अश्लिल प्रदर्शन प्रतिबंधक कायदा इत्यादी स्त्री संदर्भात विशेष धोरणांच्या बरोबर चांगले वातावरण निर्माण करून देणे जेणेकरून स्त्रीसंबंधीत प्रश्न प्रतिबिंबित होतील याचा विचार करण्यात आला. यामध्ये शासकीय आणि बिगरशासकीय घटकांच्या माध्यमातून प्रयत्न केले गेले. कृतीशील नियोजन व कार्यक्रम हाती घेण्यात आले यामध्ये सर्वात महत्त्वाचे १९७६ चे स्त्रीसंबंधी राष्ट्रीय नियोजन जे १९८८ पर्यंत मार्गदर्शक ठरले. १९८८ ते २००० मध्ये 'National Perspective Plan for Women' ही योजना महत्त्वाची ठरली. कारण या योजनेअंतर्गत स्त्रियांच्या विकासाचा सर्वव्यापी दृष्टीकोनातून मसुदा तयार करण्यात आला होता. तसेच राष्ट्रीय पातळीवर पोषक आहारासंबंधी धोरण, शिक्षणसंबंधी राष्ट्रीय धोरण, स्वास्थ्य धोरण, लोकसंख्या धोरण या माध्यमातून महिलांच्या कल्याणासंबंधी आणि विकासावर वरील धोरणांचा प्रभाव पडलेला आहे. या शिवाय राष्ट्राच्या पंचवार्षिक योजनांमध्ये स्त्रियांच्या विकासाला महत्त्व आणि भर दिलेला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत स्त्रियांकडे कल्याणकारी घटक म्हणून पाहिले व त्यादृष्टीने धोरणे राबविली गेली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये स्त्रियांच्या विकासासाठी महिला मंडळे संघटीत करण्यात आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतर्गत स्त्री शिक्षणास प्राधान्य देण्यात आले. पाचव्या योजनेंतर्गत महिलांविषयीचा दृष्टीकोन कल्याणकारी ते विकासापर्यंत बदलण्यात आला. सहाव्या योजनेत स्त्रियांना विकास प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक ठरविण्यात आला. स्त्रियांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावण्याचे ध्येय सातव्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आले. आठव्या योजनेपासून विकासाचा दृष्टीकोन बदलून स्त्रीसामर्थ्य, महिला सबलीकरण हा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला. नवव्या पंचवार्षिक योजनेत स्त्री सामर्थ्य व महिला सक्षमीकरण हे विकासाचे प्रमुख घटक ठरविण्यात आले. त्यादृष्टीने राष्ट्रीय धोरणांच्या माध्यमातून स्त्रियांना मुक्तपणे आपल्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यात कुटूंब आणि कुटूंबाच्या बाहेर स्त्री - पुरूष समानता असल्याचे वातावरण निर्माण करण्याच्या हेतूने हे धोरण स्वीकारण्यात आले. त्याचबरोबर जशा अनुसूचित जातीजमातींसाठी विशेष योजना आहेत. तशाप्रकारे स्त्रियांसाठी Women's Component Plan या नावाने धोरण निर्धारित करण्याचे भारत सरकारने ठरविले आहे.

स्त्रीयांना समाजात स्थान प्रस्थापित करण्याच्या दृष्टीकोनातून विविध योजना आखल्या गेल्या. त्यामध्ये विशेष पौष्टिक आहार नियोजन, सुलभ व समान शैक्षणिक संधी मिळण्यासाठी मुलींना मोफत शिक्षण, महाविद्यालयीन व व्यावसायिक महाविद्यालयात प्रोत्साहन देण्यापर्यंत शासनाने महिलांसाठी प्रयत्न केले आहेत. यामध्ये सर्वात महत्त्वाचे प्रयत्न म्हणजे पंचायत राज संस्थांमध्ये स्त्रियांना ३३ टक्के आरक्षण देऊन त्यांचे राजकीय व आर्थिक सामर्थ्य बळकट करण्याचे प्रयत्न झाले. याशिवाय स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करणे, ग्रामीण भागात स्वर्णजयंती स्वयंरोजगार योजना, महिला आणि बालकांचे विकास कार्यक्रम इत्यादी योजना राबविण्यात आल्या. स्त्रियांच्या उन्नतीसाठी राष्ट्रीय पातळीवर व राज्य पातळीवर अनेक धोरणे आखली असली तरी अजूनही स्त्रियांना समाधानकारक दर्जा प्राप्त झालेला नाही.

नियोजित विकासाच्या पाच दशकानंतरही विकासाच्या फळांचे असमान वितरण असल्याचे दिसते. ५० टक्के लोकसंख्या असलेल्या स्त्रिया अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अडथळ्यांमुळे विकास प्रक्रियेपासून दूर आहेत. त्यासाठी त्यांची मानसिकता बदलण्यासाठी स्त्रियांमध्ये सामार्थ्य निर्माण करणे गरजेचे आहे. म्हणूनच स्त्री सामर्थ्य आणि सबलीकरणासाठी स्त्रियांना सुशिक्षित करणे, प्रशिक्षण देणे, जाणीव व जागृती निर्माण करणे आणि आर्थिक संरचनेत पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांचे नियंत्रण निर्माण करणे हा पुरूषप्रधान व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे.

स्थानिक राजकीय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा, त्यांचा विकास व्हावा आणि राजकीय सामाजिक, आर्थिकदृष्ट्या त्या सक्षम व्हाव्यात या उद्देशाने पंचायत राज संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद १९९३ मध्ये ७३ व्या घटनादुरूस्तीव्दारे करण्यात आली. या महिला आरक्षणामुळे हजारो वर्षांच्या पुरूषांच्या मानलेल्या राजकीय क्षेत्रात खऱ्या अर्थाने महिला पाऊल टाकायला लागल्या. ३३ टक्के महिला आरक्षणामुळे महिलांच्या राजकीय सहभागाच्या कधीही न थांबण्याच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. आज संपूर्ण देशातील पंचायत राज संस्थेत जवळजवळ १० लाख महिला निवडून आल्या आहेत, तर महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीमध्ये १ लाख महिला निवडून आल्या आहेत.

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे ७३ वी घटनादुरूस्ती विधेयकानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यात आले. स्त्रियांमध्ये आपल्या राजकीय व इतर हक्काबाबत जाणीव व जागृती निर्माण झाली. सामाजिक व संस्थात्मक पातळीवर स्त्रियांचे नेतृत्व विकसित होण्यास मदत झाली. त्याचबरोबर समाजाचे बौद्धीक व शैक्षणिक पोषण झाले. थोडक्यात स्त्रियांसंदर्भात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थिती संदर्भात सुधारणाविषयक विचार सुरू झाला. सामाजिक व राजकीय घेडामोडीत स्त्री मध्यवर्ती ठरत आहे.

**संदर्भ : १.** ग. प्र. प्रधान - रा. ग. जाधव, निवडक साधना चळवळ व आंदोलने, खंड ४, साधना प्रकाशन, पुणे- २००७
२. ज. शं. आपटे, पुष्पा रोडे, भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे, ऑक्टोबर २००८
३. प्रा. सौ. माधवी कवी, महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९९.
४. डॉ. मुकूंद महाजन, पंचायती संबंधी ७३ वी घटना दुरूस्ती, पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट, मुंबई, मार्च- १९९८
५. पंचायत भारती, २० नोव्हेंबर १९९८
६. प्रा. व्ही. बी. पाटील - महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के. सागर पब्लिकेशन पुणे- २००५
७. विद्युत भागवत - स्त्री प्रश्नाची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने - प्रतिमा प्रकाशन.